# प्रकरण - चौथे

# सर्वोदय विचारधारेचे टिकात्मक परीक्षण आणि समकालीन प्रस्तुतता

# प्रकरण - चौथे

## सर्वोदय विचारधारेचे टिकात्मक परिक्षण आणि समकालीन प्रस्तुतता

मो. क. गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना दिली जाणारी अमानुष वागणूक, ब्रिटिश सत्तेने भारतीयांवर लादलेली गुलामगिरी, विषमता, संघर्ष, मतभेद, हिंसा यामुळे गांधींचे मन उदिग्न झाले होते. या परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी गांधींनी जॉन रस्कीनच्या Unto this last पुस्तकाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी 'सर्वोदया'ची संकल्पना मांडली. त्यांनी 'सर्वोदय' संकल्पनेचा "सर्व-भूत-हिताय" असा अर्थ स्पष्ट केला. म्हणजे अखिल मानव आणि ज्या सजीव प्राण्यांचा मानवाशी संबंध असतो. या सर्वांच्या उदयाचा विचार सर्वोदयात मांडला आहे. गांधींच्या मृत्यूनंतर विनोबा भावे यांनी सर्वोदयाच्या प्रसाराला सुरूवात केली. त्यातूनच त्यांना भूदान, ग्रामदानाचा साक्षात्कार झाला. सर्वोदय समाज स्थापनेसाठी समाज-परिवर्तन करण्यासाठी त्यांनी अहिंसक क्रांतीचा विचार मांडला. अशाप्रकारे सर्वोदयाच्या विकासासाठी विनोबांनी प्रयत्न केले.

गांधी व विनोबा यांच्या सर्वोदयाच्या विचारांनी प्रभावित होवून दादा धर्माधिकारी सर्वोदय विचारांकडे वळले. त्यांनी सर्वोदयाच्या प्रसारासाठी वैचारिक मार्गाचा स्वीकार केला. दादांनी जरी सर्वोदयाचा विचार गांधी-विनोबांच्या विचारांना अनुसरून आपला सर्वोदयाचा विचार मांडला असला तरी मुळच्या सर्वोदयाच्या विचारामध्ये नवीन विचारांची भर घालण्याचे कार्य दादांनी केले आहे. या विचारातून सर्वोदयाचा विकास करण्याचा प्रयत्न करून सर्वोदय विचारधारेस समग्र संवादी स्वरूप प्राप्त केले आहे. दादा धर्माधिकारींनी मांडलेल्या सर्वोदयाच्या नवीन विचारधारा जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

सर्वोदय समाज स्थापनेसाठी अस्तित्त्वात असणाऱ्या समाज व्यवस्थेमध्ये परिवर्तन करणे गरजेचे होते. या परिवर्तनासाठी विनोबांनी 'अहिंसक क्रांतीची' संकल्पना मांडली आहे. या अहिंसक क्रांतीच्या प्रक्रियेचा स्वीकार करून क्रांतीसाठी हृदय-परिवर्तनाचा मार्ग

दादा धर्माधिकारींनी सांगितला आहे. त्यांच्या मते, परिवर्तनाची सुरूवात प्रत्येकाने स्वत:पासून करणे गरजेचे असते. दादा म्हणतात, "सर्वोदय प्रक्रियेत मध्यबिंदू हृदय-परिवर्तन आहे. हृदय-परिवर्तनाचा आरंभ आपल्यापासून होतो. दुसऱ्याचे हृदय-परिवर्तन हे आपल्या हृदय-परिवर्तनाचे फळ असते." (धर्माधिकारी दादा (२००५)५९). हृदय-परिवर्तनाची सुरूवात प्रत्येकाने स्वत:पासून केल्यास समाज परिवर्तनाचा मार्ग सरळ, सोपा होतो. यातून क्रांतीची प्रक्रिया घडत जाते. ती क्रांती म्हणजे 'लोकक्रांती' होय. लोकक्रांती ही लोकांनी लोकांच्यासाठी करायची असते. यामध्ये दादांनी मानवाला केंद्रस्थान दिले आहे. त्यामुळे लोकक्रांतीला समाजातून अनुकूल वातावरण मिळते. 'लोकक्रांती' अहिंसक क्रांतीची प्रक्रिया आहे. तेथे क्रांतीचे प्रतिनिधित्त्व कोणी एक व्यक्ती करत नाही तर समाजातील सर्व लोक क्रांतीचे प्रतिनिधी असतील असा दादांचा विचार आहे. क्रांतीच्या प्रक्रियेचा आणि शिक्षणाचा अनुबंध असल्यास जनतेत जागरूकता निर्माण होते. त्यामुळे हृदय-परिवर्तन घडवून आणण्यासाठी फारसे कष्ट करावे लागत नाहीत. म्हणून शिक्षण आणि क्रांती यांचा सह-संबंध असणे गरजेचे असते असे दादांचे मत होते.

दादांनी क्रांतीच्या प्रक्रियेत 'स्वेच्छासमपर्ण' व 'संपत्तीदान' यांचा समावेश केला आहे. समाजातील मोठे-मालक आणि लहान-मालक यांच्यात एकमत होणे आवश्यक असते. प्रामुख्याने लहान मालकांच्यात जी स्वामित्त्वाची इच्छा असते ती नष्ट करण्यासाठी 'स्वेच्छासमर्पणाचा' मार्ग क्रांतीसाठी स्वीकारला आहे. दादा म्हणतात, प्रत्येकाने समाजाच्या विकासासाठी स्वमर्जीने आपल्या संपत्तीचे समर्पण केले पाहिजे. म्हणजे समाजात आर्थिक समतोल निर्माण होईल. आणि समर्पणासाठी कोणावर सक्ती करावी लागणार नाही. क्रांतीची प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी दादांनी स्वेच्छासमर्पण, हृदय-परिवर्तन आणि संपत्तीदान यांची मात्रा समाजात असणे गरजेचे असे विवेचन केले आहे.

साम्यवादी क्रांतीच्या प्रक्रियेत शेतकरी वर्गाला सामावून घेतले नसल्याने साम्यवादी क्रांती सार्वत्रिक होवू शकली नाही. सार्वत्रिक क्रांतीसाठी सर्व जनतेला

क्रांतीच्या प्रक्रियेत सामिल करून घेतले पाहिजे. म्हणून लोकक्रांती सार्वत्रिक होण्यासाठी दादांनी शेतकऱ्यांना क्रांतीच्या प्रक्रियेत सामावून घेतले आहे. त्यांच्या मते, "शेतकऱ्यांच्या क्रांतीचे पर्यवसन मजूरांच्या क्रांतीत व्हावे. आणि नंतर समाजक्रांती व्हावी." (धर्माधिकारी दादा (१९९८)१६९). अशी क्रांतीची प्रक्रिया दादांना अभिप्रेत होती. विज्ञानाची गती व सामाजिक प्रगती यांच्याशी क्रांतीची प्रक्रिया परस्पर निगडित असल्यास ती क्रांती विश्वव्यापी म्हणजे सार्वभौम होईल असा दादांना विश्वास होता. हीच अहिंसक लोकक्रांतीची प्रक्रिया समाजाच्या विकासासाठी दादांनी मांडली आहे.

सर्वोदय समाजात प्रत्यक्ष लोकशाही शासनव्यवस्था विनोबांना अभिप्रेत होती. यातूनच लोकतांत्रिक शासनव्यवस्था स्थापन करण्याचा दादांचा विचार होता. आजच्या परिस्थितीत अस्तित्त्वात असणारी लोकशाही भांडवलशाहीचे अपत्य आहे. त्यामुळे तिच्यात भांडवलशाहीचे गुण-दोष दिसून येतात. ती समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करत नसल्याने परवडणारी नाही. याबद्दल दादांचे मत आहे की, "आजच्या लोकशाहीचा जो संदर्भ, जी परिस्थिती आहे ती आपल्याला बदलावी लागेल." (धर्माधिकारी दादा (१९९८)१९८). समाज विकासासाठी आवश्यक असणारे बदल करून त्यातून लोकतांत्रिक, लोकराज्याची स्थापना करण्यासाठी लोकशाहीत मूलभूत बदलाची गरज दादांनी व्यक्त केली आहे.

या लोकराज्यामध्ये दादांनी विनोबांच्या लोकनीतीचा स्वीकार केला आहे. त्यांची लोकनीती म्हणजे, ज्या नीतीत दंडशक्ती, सत्ताशक्ती यांचा वापर न करता जी जनतेची नीती असेल त्यास लोकनीती म्हटले आहे. तर दादांनी राजनीतीतील दोषांकडे बोट दाखवत लोकसत्तेचा आधार असणाऱ्या नीतीस लोकनीती म्हटले आहे. या लोकनीतीतून दादांनी विश्वनागरिकत्त्वाची संकल्पना मांडली आहे. त्यांना विश्वराज्य कुटुंब निर्माण करायचे होते. असा लोकनीतीचा विश्वव्यापी विचार मांडला आहे.

समाजात असणाऱ्या सर्व जनतेमध्ये सहकार्याची, सहयोगाची भावना आवश्यक असते. कारण लोकतंत्रात लोकांच्या मार्फत राज्यकारभार चालवला जातो. आपल्या कुटुंबाशी जसा प्रत्येकाचा व्यवहार असतो तशाच प्रकारचा व्यवहार समाजासाठी असावा लागतो असे दादांचे मत आहे. ते म्हणतात, "सगळ्यांच्या हिताचा संकल्प असला तर सार्वमताची लोकशाही स्थापन होवू शकते." (धर्माधिकारी दादा (१९९८)२०९). समाजाच्या विकासासाठी सर्वांनी प्रयत्न केल्यास त्यांच्यात सदाचाराची, सद्भावाची भावना निर्माण होते. त्यामुळे सर्वांच्या सहमतीतून निर्णय घेतले जातात त्यातून लोकशाही यशस्वी होवू शकते. दादांच्या लोकराज्यात सैनिक, प्रशासन यांची जागा नागरिक व अनुशासन घेते त्यामुळे त्यास गुणात्मक लोकशाहीचे स्वरूप प्राप्त होते. म्हणजे गांधींना अभिप्रेत असणारे 'रामराज्य' होय. या गुणात्मक लोकशाहीच्या विचारातून स्त्री-पुरुष समानतेबरोबर स्त्री-पुरूष सहजीवनावर प्रकाशझोत टाकला आहे.

गांधींच्या रामराज्यात स्त्री-पुरूष असा भेद मानलेला नाही. सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दिली जाते. याप्रमाणे दादांनी स्त्री-पुरूष समानतेतून स्त्री-पुरूष सहजीवनाचा विचार मांडला आहे. आज स्त्रियांना दिलेल्या औपचारिक नागरिकत्त्वात बदल करण्यासाठी ब्रह्मचर्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. ती म्हणजे, "स्त्रीचे नागरिकत्त्व जर आपल्याला सार्थ करायचे असेल तर समाजात ब्रह्मचर्याचा विकास होणे आवश्यक आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)२३१). पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांच्या नागरिकत्त्वावर आक्रमन होते. हे आक्रमन रोखण्यासाठी स्त्रीयांमध्ये निर्भयत्त्व आणि पराक्रमी वृत्ती निर्माण झाली पाहिजे. म्हणून दादांनी स्त्रियांना ब्रह्मचर्यात स्थान दिले आहे.

स्त्री-पुरूष दोघांसाठी वेगवेगळे ब्रह्मचर्याचे तत्त्व सांगितले आहे. ते म्हणजे, "स्त्रीचे ब्रह्मचर्य म्हणजे पुरूषा विषयीचे निर्भयत्त्व आणि पुरूषाचे ब्रह्मचर्य म्हणजे स्त्रीविषयीच्या कामनेचा अभाव." (धर्माधिकारी दादा (१९९८)२३०). स्त्रीला भोगवस्तू

मानण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. ती एक समाजाचा जबाबदार घटक म्हणून तिच्याकडे बघितले पाहिजे. असे दादांचे मत आहे. स्त्री आणि पुरूष दोघांनी ब्रह्मचर्याचा स्वीकार केल्यास समाजात सह-नागरिकत्त्वाची भावना निर्माण होवू शकते. स्त्री मध्ये असणारी स्त्रीत्त्वाची आणि पुरूषामध्ये असणारी पुरूषत्त्वाची भावना नष्ट झाली पाहिजे. म्हणजे स्त्री-पुरुष समानतेबरोबर सह-जीवन घडून येईल असे दिसते.

दादा धर्माधिकारींच्या सर्वोदय समाजात स्वातंत्र्य, समानता, बंधूभाव, प्रेम, स्नेह या मूल्यांचा समावेश असल्याने त्यांचा सर्वोदयाचा विचार समग्र विकासाचा महान विचार आहे. त्यांनी मानवनिष्ठ समाजजीवनासाठी बंधूभावाच्या भावनेची गरज त्यांनी मांडली आहे. दादा म्हणतात, "बंधूत्त्वाकरिता संयोजन आहे. हा सगळयाच अर्थशास्त्राचा पाया आहे. सर्वोदयाचे अर्थशास्त्र हे उत्पादकाचे अर्थशास्त्र नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८)१०७). समाजाच्या विकासासाठी सर्वांच्यात बंधूभावाच्या वृत्तीतून वस्तू, सेवा यांचे उत्पादन झाले पाहिजे. यामध्ये सर्वांचा सहभाग गरजेचा असतो. सर्वोदय अर्थशास्त्राच्या प्रक्रियेत प्रत्येकाने आपल्या पुरेपूर श्रमशक्तीचा वापर करून विक्रीसाठी किंवा विनिमयासाठी उत्पादन न करता गरजेप्रमाणे उपभोग घेता यावा यासाठी उत्पादन केले जाते. या उत्पादन प्रक्रियेतून सह-उत्पादनाबरोबर सह-उपभोग घेण्यावर भर दिला आहे. दादांच्या मते, "समाजात उत्पादन सह-जीवनाकरिता व्हावे हे वास्तविक सगळयाच अर्थशास्त्राचे साध्य आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१०८). सर्वोदयाच्या अर्थशास्त्रत सहजीवनाकरिता उत्पादन होत असल्याने त्यासाठी बंधूप्रवर्तक सहजीवनाचा आधार घेतला जातो.

सर्वोदयात व्यक्तींच्या व्यक्तित्त्वाचा विकास करण्यासाठी उत्पादन केले जाते. सर्वोदय अर्थशास्त्राचे 'मेहनत माणसाची दौलत भगवंताची' हे सूत्र समाजात रूजने गरजेचे असते. या सूत्राप्रमाणे प्रत्येकाने स्वत:चे श्रम वापरून समाजासाठी उत्पादन केल्यास समाजातील सर्वांचे एक कुटुंब बनेल ते आकाराने लहान किंवा मोठे असले तरी

त्याचा आशय विश्वकुटुंबाचा असेल अशी दादांची धारणा होती. विनोबा भावेंच्या साम्ययोगाच्या विचारानूसार दादांनी सर्वोदय अर्थरचनेत सर्वांगीन विकासाचा विचार करून उत्पादनाची प्रक्रिया अवलंबली आहे. त्यांनी सर्वोदय अर्थशास्त्राचे सूत्र असे सांगितले आहे की, "काम व्रत मानायचे कामाचा दामाशी संबंध राहू नये." (धर्माधिकारी दादा (१९९८)१३१). यानूसार समाजसेवेचे व्रत म्हणून काम केले पाहिजे. समाजसेवेला जसे मूल्य नसते तशाच प्रकारे समाजासाठी केलेल्या श्रमाचाही मोबदला दिला नाही. श्रमातून मिळणारे सर्व उत्पन्न समाजाचे असते. कारण उत्पन्नाची सर्व साधने समाजाच्या मालकीची असतात. त्यामुळे उत्पादनावर सामाजाची मालकी असते. सर्वोदय समाजात दुसऱ्याच्या विकासाला प्राधान्य असल्याने उत्पादन समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून केले जाते. यातून सर्वोदय समाजासाठी आवश्यक असणारी मानवतेची व समाजशीलतेची वृत्ती विकसित होईल असे दादांना वाटत होते.

उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या श्रमशक्तीतून मानवाच्या शारीरिक, बौद्धिक कला गुणांच्या क्षमतेचा विकास होतो. म्हणून प्रत्येकाने श्रम केले पाहिजेत. या बाबत दादांचे असे मत आहे की, "सर्वोदयाच्या प्रक्रियेत उत्पादन, परिश्रम, व्यायाम आणि खेळ यांच्यातील अंतर कमी झाले पाहिजे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१४७). श्रमाची खेळा इतकी आवड निर्माण झाली पाहिजे. दुसऱ्यासाठी उत्पादन करण्याच्या प्रक्रियेतून समाजकार्याचा आनंद मिळत असतो. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता श्रम करणे गरजेचे असते. म्हणजे समाजासाठी श्रम 'दान' करणे होय. श्रमदान हे स्वमर्जीने व्हावे लागते. कारण श्रमदानातून संपत्तिदानाची प्रक्रिया घडत असते. म्हणून श्रम हे समाजसेवेसाठी खर्च केले जावेत असे दादांचे मत आहे.

दादांनी सर्वोदयाच्या सांस्कृतिक आधारामध्ये मानवीय आणि नैतिक मूल्यांचा समावेश केला आहे. यामुळे समाजात असणारे सर्व मतभेद नष्ट होतात. असे त्यांचे मत आहे. सर्वोदयाचा विचार हा मूलतः सांस्कृतिक असल्याने त्याच्या विकासाची साधने ही

सांस्कृतिक व अहिंसक असावी लागतात. विनोबांनी समाजातील सैनिक व नागरिक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी नागरिकांनीच सैनिक बनावे म्हणून शस्त्र निरपेक्षतेची आणि शांतीसैनिकांची आवश्यकता स्पष्ट केली. याप्रमाणे दादांनी युद्ध आणि शस्त्राचे मूल्य नष्ट करून निःशस्त्रीकरणाला महत्त्व दिले आणि संत, वीर, नागरिक, स्थळ, वेळ यांचा समाजाची मूल्ये म्हणून स्वीकार केला. त्यांनी सर्वोदय समाजाच्या सांस्कृतिक आधारामध्ये मानवीय विभूतीला मूल्य मानले आहे. विभूतीयोगातून नागरिकांचे राज्य येईल. परंतू त्यासाठी यंत्राचे आणि प्रचलित लोकतंत्राचे मूल्य नष्ट होणे गरजेचे आहे असा त्यांचा विचार आहे. अशाप्रकारे दादांनी मानवीय विभूतीयोगाला सर्वोदय समाजाच्या सांस्कृतिक मूल्यांत महत्त्वाचे स्थान विशद केले आहे.

विनोबा भावे यांनी सर्वोदय समाज स्थापनेसाठी राज्यविहिन, वर्गविहिन समाजाचा विचार मांडला आहे. परंतू समाजात असणारे वर्ग पूर्णतः कधीही नष्ट होणार नाहीत म्हणून दादा धर्माधिकारी यांनी वर्गविहिन समाजाऐवजी वर्ग-निराकरण करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या मते, वर्ग-निराकरणासाठी, जाति-निराकरणाची गरज आहे. तसेच उत्पादक-श्रमिक, वरिष्ठ-कनिष्ठ वर्गाचे निराकरण केले पाहिजे. समाजात काही लोकांच्याकडून एकच व्यवसाय केला जातो तेव्हा तो एक व्यवसाय करणारा एक वर्ग निर्माण होतो. म्हणून सर्वप्रथम व्यवसायाचे निराकरण होणे आवश्यक आहे. विनोबांनी 'साम्ययोग' समाजासाठी वर्ग-विहिन समाजाचा विचार मांडला आहे. याबाबत दादा असे मत मांडतात की, "वर्ग-निराकरणाशिवाय साम्ययोगाची स्थापना असंभव आहे." (धर्माधिकारी दादा (२००५)२३४). समाज विकासाच्या प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या सर्व घटकांचे निराकरण करणे गरजेचे असते. त्यासाठी दादांनी 'आत्म-शक्तीचा' नवीन मार्ग सुचवला आहे. वर्ग-निराकरणातून संघर्ष, हिंसा निर्माण होत नाही. म्हणून वर्गाचे निराकरण करणे हा सर्वोदय समाजासाठी योग्यतेचा मार्ग आहे. असा दादांचा विचार आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

समाजात अनेक समूहांचे लोक राहत असल्याने त्यांच्यात संघर्ष निर्माण होतात. या संघर्षात हिंसक मार्गाचा अवलंब केला जातो. संघर्षातून सह-संघर्ष निर्माण झाल्यास संघर्ष अधिक वाढत जातो. त्यामुळे संघर्षाचे स्वरूप बदलण्यासाठी दादांनी त्यास 'प्रतिकारा'चे नवे स्वरूप प्रदान केले आहे. प्रतिकारामुळे संघर्षाचे तत्त्व नष्ट होते आणि संघर्षाचे सामाजिक मूल्यांत रूपांतर होते. ज्या संघर्षास सह-अनुष्टान असते तो संघर्ष समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करत नाही. म्हणून संघर्षास बुद्धीपूर्वक सह-अनुष्ठानाची गरज असते. दादांच्या मते, "संघर्षाचे तत्त्व सामाजिक प्रगतीचे तत्त्व नाही. जो प्रतिकार सहयोगात्मक तो प्रगतिकारक, जो संघर्षात्मक तो अप्रगतिकारक कारण त्याचे सह-अनुष्ठान होवू शकत नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८(४६). म्हणून प्रतिकारात संघर्ष कमी करून 'सहयोग' वाढवणे गरजेचे आहे असे दादांचे मत आहे.

सर्वोदय समाजात राजकीय प्रतिकाराची गरज आहे. हे ओळखून विनोबा भावे यांनी 'सत्यग्राह्य'ची संकल्पना मांडली. त्याचा विकास करून दादांनी 'सहयोगी प्रतिकार' ही संकल्पना मांडली. 'सहयोग' आणि 'प्रतिकार' या दोन्ही संकल्पनांचा दादा असा अर्थ सांगतात की, "सामान्य गुणांच्या उत्कर्षासाठी होणाऱ्या सामूहिक प्रयत्नाला संयुक्त पुरूषार्थाला 'सहयोग' असे म्हणतात." (धर्माधिकारी दादा (१९९८)४८). तर "'प्रतिकार' म्हणजे व्यावर्तक भावनेचे आणि दोषांचे निराकरण करणे होय." (धर्माधिकारी दादा (१९९८)४८). यावरून सहयोगी व प्रतिकार यांच्यातील फरक स्पष्ट होतो. 'सहयोग' सर्व व्यक्तींशी करावयाचा असतो तर 'प्रतिकार' हा वाईट गुणांचा करायचा असतो. मानवी विकासावर परिणाम होणार नाही अशा दृष्टिने प्रतिकार करायचा असतो.

वाईट भावना, घटक यांच्या निराकरणासाठी प्रतिकारास सह-अनुष्ठान प्राप्त होते. तेव्हा ते 'सामुदायिक प्रतिकार' होतो. 'सामुदायिक प्रतिकारात' सहयोगाची भावना असते. त्यामुळे तो मानवी गुणांच्या विकासासाठी पोषक असतो. दादांच्या मते, "माणसाचे

उत्थान व्हावे म्हणून वाईटाचा प्रतिकार करायचा आणि वाईट माणसाशी सहकार करायचा असा त्याचा अर्थ आहे म्हणून त्याला 'सहयोगात्मक प्रतिकार' असे म्हणतात." (धर्माधिकारी दादा (१९९८)४९). प्रामुख्याने वाईट कृत्यांचा विरोध केला जातो आणि मानवतेच्या भूमिकेतून वाईट कृत्य करणाऱ्या माणसाशी सहयोग केला जातो. म्हणजे जो प्रतिकार असतो तो 'सहयोगात्मक प्रतिकार' असतो. असा दादांचा 'सहयोग' व 'प्रतिकार' याचा विचार आहे.

सर्वोदय समाजात समानतेबरोबरच सहजीवन येण्यासाठी 'सहयोगाची' आवश्यकता असते. 'सहयोग' हा सम-विचार, सह-विचार यावर भर देते. यातून परस्परांच्या विकासाचा विचार पूढे येतो आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा व्यापक विचार केला जातो. या सामूहिक विकासाच्या विचारातून सहयोगाची प्रक्रिया घडून येताना दिसते. म्हणून दादांनी सर्वोदय समाजासाठी 'सहयोगात्मक प्रतिकाराचा' हिंसक मार्ग सांगितला आहे.

अशाप्रकारे दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदय विचाराच्या विकासासाठी प्रयत्न केले आहेत. यामध्ये क्रांतीच्या मार्गाने परिवर्तन घडवून आणण्यासाठी अहिंसक लोकक्रांतीचा मार्ग सुचवला आहे. स्त्री-पूरूष सहजीवनासाठी लोकतांत्रिक, लोकराज्याच्या स्थापनेसाठी लोकनीतीच्या विचारातून गुणात्मक लोकशाहीचा मार्ग सांगितला आहे. तसेच सर्वोदय समाजासाठी सर्वोदयाचे वेगळे अर्थशास्त्र नमूद करून त्यामध्ये समाज विकासासाठी आवश्यक असणारी उत्पादन पद्धतीचा विचार मांडला आहे. सर्वोदय समाजाचे सांस्कृतिक आधार सांगताना 'मानवी विभूतीचे' महत्त्व स्पष्ट केले आहे. वर्ग-निराकरण करून सर्वोदय समाज स्थापनेसाठी त्यांनी जाती, व्यवसाय निराकरणापासून आरंभ केला. यामध्ये संघर्ष असलौ तरी तो सहयोगात्मक प्रतिकाराच्या स्वरूपात संघर्ष असतो असे दादांनी मत मांडले आहे. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, ट्रस्टीशिप, ब्रह्मचर्य, आस्वाद, शरीरश्रम, सर्वधर्म समानत्त्व आणि स्वदेशी या सर्वोदय समाजाच्या उद्दिष्टांची

पूर्तता करण्यासाठी दादा धर्माधिकारी यांनी वरील विचारातून प्रयत्न केले आहेत. या वैशिष्ट्यांच्या आधारावर सर्वोदय समाज स्थापन होईल अशी त्यांना अपेक्षा वाटत होती. हे सर्व दादांचे सर्वोदय समाजासाठीच्या विकासाचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

**दादांच्या सर्वोदय विचारावरील मर्यादा आणि समकालीन प्रस्तुतता :**

सर्वोदय समाजाच्या स्थापनेसाठी दादा धर्माधिकारींनी केलेली मांडणी सर्वोदय विचाराला अधिक प्रघल्भ करणारी आहे. विशेषतः त्यांची लोकक्रांती, लोकनीती यासंबंधीची मते, ही अत्यंत औचित्यपूर्ण आहेत. विशेषतः लोकशाहीचा दर्जा दिवसेंदिवस ढासळत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचे लोकशाही संबंधीचे विचार लोकशाही सदृढ करण्यास निश्चितच उपयुक्त आहेत. लोकक्रांतीमध्ये हृदय-परिवर्तनाला महत्त्वाचे स्थान आणि याशिवाय कोणताही प्रयत्न शक्य नाही ही भूमिका मांडली. सद्यःकाळात समाजात वाढत चाललेली असंहिष्णूता व हिंसा यांच्या पार्श्वभूमीवर हृदय-परिर्तनाला केंद्रीभूत मानणारे दादांचे अहिंसक क्रांतीचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. समताधिष्ठित समाज स्थापनेसाठी व स्त्रीसाठी होणारी विषमता संपूष्टात आनण्यासाठी त्यांची स्त्री-पुरूष सहजीवनाची संकल्पना क्रांतीकारकआहे. किंबहूना सर्वोदय विचारामध्ये स्त्री-पुरूष सहजीवन हे दादांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

दादांनी केलेली सहयोगात्मक प्रतिकाराची मांडणी आजच्या काळात अत्यंत उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचे परिशिलन करून सर्वोदय समाज स्थापनेसाठी जर प्रयत्न झाले तर समाज व त्यातील प्रत्येक माणूस सुखी होईल. त्यांचा उदय होईल आणि असा समाज अधिक चिरंजीवी आणि स्थायी असेल. अशारितीने दादांचे विचार सद्यःकाळात औचित्यपूर्ण असले तरी त्या विचारांना मान्यता मिळणे आणि त्यानुरूप समाजव्यवस्था स्थापन करणे हे मोठे आव्हान आहे. कारण समाजात भांडवलशाही मूल्यातील स्पर्धेला अधिक महत्त्व आहे. समाजात अधिकाधिक चंगळवाद वाढत आहे. समाजाला बाजारी स्वरूप प्राप्त होत आहे. स्वार्थ, हिंसा, असंहिष्णूता यासारख्या भावना

वाढत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर प्रेम, अहिंसा, सहजीवन समाजासाठी उत्पादन यासारख्या मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. त्यामुळे समाजात सर्वोदय विचार रूजने हे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. असे असले तरी त्या विचारातील चिरंतनत्त्व आणि त्याचा दृष्टिपना शोधने आवश्यक असते.

साम्राज्यवाद, भांडवलशाही यांना विरोध, नवसमाज निर्मितीला प्रोत्साहन देणे. त्यासाठी अहिंसक लोकक्रांतीची गरज आणि हिसंक क्रांतीला विरोध, वर्ग-निराकरण, स्त्री-पुरूष समानतेबरोबर सहजीवनावर अधिक भर यासारखी अनेक वैशिष्ट्ये दादा धर्माधिकारींच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाची आहेत. स्वातंत्र्य, समानता, एकता, बंधूत्त्व या गुणांनी परिपूर्ण असणारी लोकशाही शासन व्यवस्था निर्माण करणे ही सर्वोदयाची शाश्वत मूल्य आहे. या मूल्यांनुसार नवीन समाजव्यवस्था अस्तित्त्वात येणे ही काळाची गरज आहे. कारण अतिकेंद्रित राज्यव्यवस्था, कायदे-विधिनियम, अस्तित्त्वात असणारी लोकशाही शासनप्रणाली आणि तदनुषंगिक निवडणूका, राजकीय पक्ष, वाढत्या प्रमाणातील औद्योगिकरण आणि यांत्रिकीकरण यांच्यातील दोष उणिवा नष्ट करण्यासाठी दादांची सर्वोदय विचारसरणी अवलंबने गरजेचे आहे. त्याशिवाय भारतासाख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला पर्याय राहत नाही. समाजात आर्थिक, राजकीय, सामाजिक हिंसेचा वापर होतो. म्हणून यापासून समाजाला दूर करण्यासाठी सर्वोदयाचा स्वीकार केला पाहिजे.

जातीनिर्मूलन, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद, स्त्रियासाठी नागरिकत्त्व, ब्रह्मचर्य, शेतकरी-शेतमजूर यांचे अधिकार आणि त्यांची आजच्या समाजाला असणारी गरज बघितल्यास सर्वोदयाचा विचार उपयुक्त आहे. कारण आजची आर्थिक संरचना भांडवलशाहीच्या भोवऱ्यात अडकत आहे. तेव्हा त्यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी सर्वोदय विचाराची गरज आहे. नलिनी पंडित यांच्या मते, "विशिष्ट समाजव्यवस्थेमूळे होणारे अन्याय व्यक्तीनिष्ठ नसून संस्थात्मक स्वरूपाचे असतात. त्यांचे निराकरण करण्यासाठी आर्थिक

व सामाजिक व्यवस्थेत मूलगामी परिवर्तन घडून आणावे लागते." (समाज प्रबोधन पत्रिका, जाने-फेब्रु. १९७६). या मूलगामी परिवर्तनातून सर्वोदयप्रणित सर्वकल्याणकारी अन्यायाचे निराकरण करणारी समाज व्यवस्था निर्माण होईल. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तीविकास होईल. म्हणून सर्वोदय विचारांची समाजात रूजवणी होणे आवश्यक आहे.

भारताला भविष्यात का होईना सर्वोदयाचा मार्ग अनुसरण्याखेरीज गत्यंतर नाही. तसेच जगालाही त्याची तितक्याच प्रमाणात गरज आहे. रक्तपात, हिंसा, फसवणूक यासारख्या समाजविघातक घटकामुळे मानवी जीवन जगणे असह्य झाले आहे. यातून बाहेर पडण्यासाठी म्हणून सर्वोदयाचा मार्ग स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही. असा हा सर्वोदयाचा दादा धर्माधिकारींचा महान विचार प्रत्यक्षात येणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयाच्या मुळच्या विचारात भर घातली. आणि सर्वोदयाचा विकास करण्याचा प्रयत्न केला. परंतू त्या विचारावर काही प्रमाणात यावर मर्यादा आल्या आहेत. तरीही त्यांचा सर्वोदयाचा विचार अवलंबने ही आजच्या परिस्थितीत काळाची गरज आहे. यावरून दादांच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाचे निष्कर्ष काढले आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) धर्माधिकारी दादा : (१९९८), 'सर्वोदय दर्शन', परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

२) धर्माधिकारी दादा :(१९९८), 'सर्वोदय दर्शन', (संशोधित-परिवर्द्धित-संस्करण), सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

३) धर्माधिकारी दादा : (२००२), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-१, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

४) धर्माधिकारी दादा : (२००२), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-२, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

५) धर्माधिकारी दादा : (२००३), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-३, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

६) धर्माधिकारी दादा : (२००५), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-४, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

७) समाज प्रबोधन पत्रिका, जाने.-फेब्रु. १९७६.